भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ४४० / माहिती कक्ष / वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १० / ०६ / २०१७

**१) मुलीवर अत्याचार केल्याने गुन्हा नोंद . :–**

सन २०१६ ते ०९ / ०६ / २०१७ पर्यत यातील पिडीत फिर्यादी मुलगी हिला आरोपीने लग्नाचे आमिष दाखवुन तिचेवर वारंवार अत्याचार करुन लग्नास नकार दिल्याने पिडीत फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३७६(२)(एन) भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. जटाळ पो.स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

**२) तनसिचे ढिंग जाळुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०९ / ०६ / २०१७ ते ०२.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी यांचे तनसीचे दोन ढिंग जाळुन किंमती ७,००० / –रु. चे नुकसान करुन संशयीत आरोपी छोटु गोवर्धन बिसने यांने जाळले असावे असा संशय दर्शविल्याने फिर्यादी श्रीकृष्ण वामण बर्वे वय ४० वर्ष, रा. शिलेगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे सिहोरा येथे कलम ४३५ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मुंडले पो. स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

**३) गैरकायदयाची मंडळी जमवुन हाता बुक्यांनी व चपलांनी मारहाण करुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०६ / ०६ / २०१७ ते १७.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी रमेश चैतराम गराळे वय २६ वर्ष, रा. मांडेसर यानी आपली शेतजमीन भुमी अभिलेख कार्यालयाकडुन मोजनी करुन हद्द कायम केली व आपले सिमेवर खड्डे करुन पोल गाडत असतांना यातील आठ ही आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादीचे भावु व त्याचे काकास लोखंडी पोल गाळण्यास मनाई करुन त्याचे जागेवर अतिक्रमण करुन हाता बुक्यांनी व चपलांनी मारहाण करुन जखमी केल्याने फिर्यादींचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोस्टे मोहाडी येथे कलम ३२३,१४३,१४७,४४७ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गेडाम पो. स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**४) संगनमत करुन घराचे दुकानाचे हिस्याचे कारणावरुन लोखंडी रॉडने डोक्यावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०८ / ०६ / २०१७ चे २२.३० वा. ते ०९ / ०६ / २०१७ चे ००.३० वा. दर. यातील आरोपी क्र. ०१ हिने फिर्यादी सोबत घरघुती कारणावरुन भांडण करुन डाव्या हातावर मारले व ईतर ०३ आरोपी यांना फोन करुन बोलावुन त्यांनी फिर्यादीस तु आरोपी क्र. ०१ हिला का मारले तसेच घराचे व दुकानाचे हिस्याचे कारणावरुन आरोपी क्र. ०१ ते ०४ यांनी संगनमत करुन आरोपी क्र. ०२ याने लोंखडी रॉडने फिर्यादीचे डोक्यावर मारुन जखमी केल्याने फिर्यादी मुकेश सिताराम अग्रवाल वय ३९ वर्ष, रा. शिवनगर तुमसर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. तुमसर येथे कलम ३२४,३४ भांदवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गोंडाणे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**५) संगनमत करुन शिवीगाळ व भांडण करुन गालावर, मानेवर चाकुने मारुन दुखापत केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०८/०६/२०१७ चे २०.०० वा. दर. यातील फिर्यादी राजेश फुलचंद बर्वे वय ३३ वर्ष, रा. खरबी हा आरोपी क्र. ०१ यास खर्रा खाण्यास मागितले असता आरोपीने माझे कडे सट्टा लावलास नाही तुला खर्रा देत नाही असे म्हणुन आरोपी क्र. ०२ सोबत संगनमत करुन शिवीगाळ व भांडण करुन फिर्यादीचे गालावर, मानेवर चाकुने आरोपी क्र. २ ने मारुन दुखापत करुन पाहुण घेण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोस्टे. जवाहरनगर येथे कलम ३२४,५०४,५०६,३४ भांदवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जनबंधु पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**६) अवैध देशी दारु/जुगार अडयावर धाडी . :–**

दिनांक ०९/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा, जवाहरनगर, मोहाडी, तुमसर, आंधळगाव, गोबरवाही पवनी, व अडयाळ येथे अवैध देशी दारु /जुगार अडयावर धाडी घालुन एकुण १४ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन २२४ लिटर हातभट्टी दारु किंमती २०,७५०/–रु व ३३९ लिटर ७८० मिली लीटर देशी + विदेशी बिअर १ इंडीका गाडी किंमती ३००८१२/–रु. तसेच जुगारातुन किंमती किंमती ५३,६२५/–रु. असा एकुण किंमती ३,७५,१८७/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस नियंत्रण कक्ष अधिकारी
भंडारा करीता
दुरध्वनी.९४२३११५१८२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.